दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे   संपादक : बंडूभाऊ इंगोले   RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ ■ वर्ष : २ ■ अंक : २६८ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# अरवली प्रकरणात सुप्रीम कोर्टाने आपल्याच निर्णयाला दिली स्थगिती

## सरकारकडून माहिती आणि तज्ज्ञ समितीकडून मागविला अहवाल

**नवी दिल्ली :** अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांची व्याख्या, ५० मीटरच्या पलीकडे असलेल्या परिस्थितीसाठी मनाई किंवा परवानगी आणि त्याची व्याप्ती याबाबत गंभीर संदिग्धता दूर करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करून सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अरवली प्रकरणात दिलेल्या आपल्याच निर्णयाला स्थगिती दिली व सरकारकडून माहिती आणि तज्ज्ञ समितीकडून अहवाल मागवला. या सुनावणीनंतर, सर्वोच्च न्यायालयाने संघराज्य सरकार आणि चार संबंधित राज्यांना नोटीस बजावल्या. तसेच तज्ज्ञांचे एक नवीन पॅनेल स्थापन करण्याचे निर्देश दिले आणि पुढील सुनावणी २१ जानेवारीला निश्चित केली.



गेल्या काही दिवसांपासून अरवली पर्वतप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला राजस्थानसह हरयाणामधून विरोध सुरू होता. न्यायालयाच्या काही परिणामात्मक निरीक्षणांचे चुकीचे वर्णन केले जात आहे, ज्यावर स्पष्टता आवश्यक आहे, असे न्यायालयाने यावेळी सांगितले व सर्वोच्च न्यायालयाने १९ नोव्हेंबरच्या आपल्याच आदेशाला स्थगिती दिली. २० नोव्हेंबरच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यापूर्वी निष्पक्ष आणि ठोस अहवाल आवश्यक आहे. सरन्यायाधीशांनी असेही म्हटले की, अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांची व्याख्या, ५० मीटरच्या पलीकडे असलेल्या परिस्थितीसाठी मनाई किंवा परवानगी आणि त्याची व्याप्ती याबाबत गंभीर संदिग्धता दूर करणे आवश्यक आहे.

केंद्र सरकारने त्यांची नवीन व्याख्या अधिसूचित केली, तेव्हा हे संपूर्ण प्रकरण सुरू झाले. त्याची रचना कार्यकर्ते आणि तज्ज्ञांनी पुरेशा मूल्यांकनाशिवाय किंवा सार्वजनिक सल्ला मसलतीशिवाय करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यामुळे हरयाणा, राजस्थान आणि गुजरातमधील अरवली पर्वतरांगांचा मोठा भाग खाणकामाच्या धोक्यात येऊ शकतो, असे बोलले जात होते. नोव्हेंबर महिन्यामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला या क्षेत्रात कोणत्याही नवीन खाणकामाला परवानगी देण्यापूर्वी शाश्वत खाणकामासाठी एक व्यापक योजना तयार करण्याचे निर्देश दिले होते. आजच्या सुनावणीदरम्यान केंद्राच्यावतीने युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, न्यायालयाने गेल्या महिन्यात ती योजना स्वीकारली होती. आम्हाला वाटते की समितीचा अहवाल आणि कोर्टाच्या निरीक्षणांचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. काही स्पष्टीकरण आवश्यक आहे आणि अंमलबजावणीपूर्वी, निष्पक्ष, तटस्थ आणि स्वतंत्र तज्ज्ञाचे मत विचारात घेतले पाहिजे, असे सीबीआयने म्हटले आहे.

---

## ‘माझे मत – माझे भविष्य’ अभियान स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केली मतदानाबाबत जनजागृती

**ठाणे :** ‘माझे मत-माझे भविष्य’ .. “आम्ही राबवू स्वच्छता अभियान, पण तुम्ही करा हक्काने मतदान” अशा घोषणा देत स्वच्छता कर्मचाऱ्यांनी उथळसर प्रभाग समिती अंतर्गत मतदार जनजागृती अभियान यशस्वीपणे राबविले. महापालिका आयुक्त निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखली, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त तथा स्वीप नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने स्वीप उपक्रमांतर्गत शहरातील विविध ठिकाणी मतदानाबाबत




जनजागृती करण्यात येत आहे. आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या पुढाकाराने स्वीप (SVEEP) पथकाच्या वतीने उथळसर प्रभाग समितीअंतर्गत (प्रभाग क्र. 10,11 व 12) मतदार जनजागृती अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. आंबे घोसाळे तलाव व केसर मिल सर्कल परिसरात स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून ‘माझे मत – माझे भविष्य’ या संकल्पनेवर आधारित हे अभियान आयोजित करण्यात आले.

या अभियानात स्वच्छता कर्मचाऱ्यांना मतदानाचे महत्त्व, लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे स्थान तसेच प्रत्येक नागरिकाची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मतदान का करावे, मतदानाद्वारे सक्षम लोकशाही कशी बळकट होते, याची माहिती देत उपस्थितांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. यावेळी मतदान जनजागृतीपर सामूहिक घोषणा देण्यात आल्या तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत मतदानाची सामूहिक शपथ घेण्यात आली.

मतदान हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य असून तो एक महत्त्वाचा अधिकार आणि जबाबदारी आहे, याची जाणीव उपस्थित कर्मचाऱ्यांना करून देण्यात आली.

---

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तक्रार निवारण कक्ष सक्रिय; नागरिकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन

**ठाणे :** आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व नियमबद्ध रितीने पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. निवडणुकीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध तक्रारींचे तात्काळ निवारण व्हावे, या उद्देशाने हा कक्ष सुरू करण्यात आला असून नागरिकांनी +91 91528 17252 दूरध्वनी क्रमांकावर किंवा tmcelectiongrievance@thanecity.gov.in ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी केले आहे. निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, बेकायदेशीर प्रचार, भिंतींवर पोस्टर्स-बॅनर्स लावणे, मतदारांवर दबाव, पैशांचा किंवा वस्तूंचा गैरवापर, खोटी माहिती पसरवणे, मतदान प्रक्रियेशी संबंधित अडचणी, तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांविषयीच्या तक्रारी याबाबत नागरिक या तक्रार निवारण कक्षात संपर्क करू शकतात. प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन त्यावर तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

तक्रार निवारण कक्षात प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून संबंधित विभाग, क्षेत्रीय अधिकारी, पोलीस प्रशासन व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून तक्रारींचे वेळेत निराकरण केले जाणार आहे.

तक्रार करणाऱ्या नागरिकांची माहिती गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून स्वच्छ, मुक्त व निष्पक्ष निवडणूक पार पाडण्यासाठी नागरिकांनी या तक्रार निवारण व्यवस्थेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## नौपाडा भाजी मंडईत दुमदुमला मतदार जनजागृतीचा नारा

**ठाणे :** आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर नौपाडा–कोपरी प्रभाग समिती अंतर्गत स्वीप (SVEEP) पथकाच्या वतीने मतदार जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. “मतदान हा माझा अधिकार असून ते माझे राष्ट्रीय कर्तव्य आहे,” याची जाणीव करून देत लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे मत किती महत्त्वाचे आहे याबाबतची जनजागृती या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी उपायुक्त तथा स्वीप नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने शहरातील विविध परिसरात जनजागृती अभियाना राबविण्यात येत आहे. प्रभाग क्रमांक 19,20,21 व 22 च्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रज्ञा सावंत यांच्या पुढाकाराने नौपाडा भाजी मंडई परिसरात हा उपक्रम राबविण्यात आला.

नौपाडा भाजी मंडईत दररोज मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येत असल्याने या ठिकाणी मतदार जनजागृतीसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

---

## सीईटीची नोंदणी १ जानेवारीपासून

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) आगामी २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या सामाईक प्रवेश परीक्षांसाठी नोंदणीला सुरुवात १ जानेवारीपासून करण्यात येणार आहे. प्रवेश परीक्षांच्या संकेतस्थळाच्या चाचण्या सुरू असून, त्या पूर्ण होताच नोंदणीला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी दिली.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण या सहा विभागांतर्गत एकूण २० विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा व ७३ अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. व हे प्रवेश ५७०० पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थामधून दिले जातात. प्रवेश देण्यासाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात येते.

आगामी शैक्षणिक वर्षात बहुतांश व्यावसायिक अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात घेण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये यंदापासून इंजिनिअरिंग, फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी पीसीएम ग्रुपची एमएचटी सीईटी आणि कृषी अभ्यासक्रमासाठी महत्त्वपूर्ण असलेली पीसीबी ग्रुपची एमएचटी सीईटी, तसेच एमबीए /एमएमएस अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा दोनदा घेतली जाणार आहे. त्यांचे नियोजन सीईटी सेलने सुरू केले असून, त्याचे संभावित वेळापत्रक जाहीर केले आहे.

याबरोबरच सीईटी परीक्षेसाठी नोंदणी करताना उमेदवारांना आधार प्रमाणीकरण आणि अपार आयडी सक्तीचा करण्यात आल्याची माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने दिली आहे. सीईटी परीक्षा वेळेत होऊन प्रवेश प्रक्रियाही वेळेवर पार पाडण्याचा सीईटी सेलचा प्रयत्न आहे. त्यानुसार आता १ जानेवारी पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक सीईटी परीक्षांची नोंदणी सुरू केली जाणार आहे. त्यादृष्टीने सीईटी सेलचे प्रयत्न सुरू आहेत,

---

# स्वच्छ सर्वेक्षणासाठी प्रत्येक टप्प्यावर नियोजनबद्ध व शिस्तबद्ध काम करणे आवश्यक : आयुक्त सौरभ राव

**ठाणे :** स्वच्छ सर्वेक्षण हे केवळ गुणांकनापुरते मर्यादित नसून शहराच्या एकूण जीवनमानाशी निगडित आहे. घनकचरा व्यवस्थापन, ओला व सुका कचरा विलगीकरण, घराघरातून कचरा संकलन, सार्वजनिक स्वच्छता व्यवस्था आणि कचरा प्रक्रिया या प्रत्येक टप्प्यावर नियोजनबद्ध व शिस्तबद्ध काम करणे आवश्यक आहे. नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे ओळखून क्षेत्रीय पातळीवर प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत स्पष्ट केले.



केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२५ करिता महानगरपालिकेच्या वतीने प्रभागसमितीनिहाय टास्क फोर्स स्थापन करण्यात आली असून या टास्क फोर्सचे सदस्य म्हणून अंतर्गत नोडल अधिकारी नेमण्यात आले आहेत. या नोडल अधिकाऱ्यांसाठी आज (30 डिसेंबर) ठाणे महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमास उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, मधुकर बोडके, दीपक झिंजाड, मिताली संचेती, अनघा कदम, घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी उपस्थित होते.

नोडल अधिकाऱ्यांच्या क्षमता वृद्धी (Capacity Building) प्रशिक्षण कार्यक्रमात आयुक्त सौरभ राव यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. शहर स्वच्छतेत गुणवत्ता, सातत्य आणि नागरिक सहभाग या तीन घटकांवर भर देत त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना उद्देशून मार्गदर्शन केले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मधील नवीन मार्गदर्शक सूचना, गुणांकन पद्धती आणि मूल्यांकन निकष यांची सखोल माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. माहिती संकलन, दस्तऐवजीकरण, फोटो व जीपीएस आधारित नोंदी, तसेच ऑनलाईन प्रणालीवर अचूक व वेळेत माहिती अपलोड करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. कोणतीही माहिती अपूर्ण राहू नये यासाठी प्रत्येक घटकाची तपासणी करून कामकाज करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

## संपादकीय

### आव्हाने पेलण्याची सज्जता हवी

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप आणि अमेरिका जवळपास एकसारखे बोलायचे आणि वागायचे. ते रशियाच्या विरोधात होते. पण सरत्या वर्षामध्ये अमेरिकेने धोरण बदलल्याचे दिसत असून युरोपला वाऱ्यावर सोडल्यासारखी स्थिती आहे. अमेरिकेने भारतावरही मजबूत आयात कर लावला. खेरीज, भारत-रशिया संबंधांमध्ये वितुष्ट आणण्याचेही त्यांचे प्रयत्न आहेत. याचाच एक भाग म्हणून भारताने रशियाकडून तेल खरेदी करण्यावर अंकुश ठेवण्याचा विचार बोलून दाखवला गेला आहे. अर्थात भारताने धमकीला न जुमानता वेगळ्या मार्गाने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली. मात्र याचा भारतातील जनतेला तेलाच्या किमती कमी होण्याच्या रुपाने कोणताही लाभ मिळाला नाही. अडाणी, अंबानींसारख्या उद्योगपतींना याचा खात्रीने फायदा होत आहे. त्यांच्या रिफायनरीला पैसे मिळत असल्यामुळे पेट्रोल निर्यात करुन हे समूह मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवत आहेत. २०२५ मध्ये भारतावर अमेरिकेचा वाढता दबाब प्रकर्षाने दिसून आला. याचे एक कारण म्हणजे 'ब्रिक्स'मध्ये चीन आणि रशिया हे देश मजबुतीने उभे आहेत. ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकादेखील अमेरिकेच्या दबावाखाली येणार नाहीत. तेव्हा या गटातील भारत हा एकच देश अमेरिकेच्या दबावाखाली येण्याजोगा आहे. तसे बघायला गेले तर मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्वीपासूनच अमेरिकेला अनुकूल राहिले आहेत. त्यातच अमेरिकेत स्थायिक झालेल्या, वास्तव्यास असणाऱ्या भारतीयांचे प्रमाणही प्रचंड आहे. तेदेखील भारताने अमेरिकेला अनुकूल भूमिका घेण्याच्या मताचे आहेत. त्यामुळेच अमेरिका भारतावर इतका दबाव निर्माण करत असूनही मोदी शांत आहेत. चीननंतर सर्वात मोठी अर्थव्यवस्था असणारा एकमेव देश म्हणजे भारत. पण एका अर्थाने तो परावलंबी आहे, हेदेखील विसरुन चालणार नाही. नवीन आर्थिक धोरण आल्यानंतर तर परकीय चलनासाठी भारताचे पाश्चात्य देशांवरील अवलंबित्व कमालीचे वाढले आहे. १९८४ च्या आधीचा भारत आत्मनिर्भरतेकडे प्रवास करणारा होता. बदलत्या धोरणांमुळे आता तो अडचणीत सापडला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय उद्योगपतींनी स्वतःला शक्तिमान बनवले होते. मात्र आता तेच परदेशांमध्ये पैसे गुंतवण्यास प्राधान्य देत आहेत. म्हणजेच भारतात येणाऱ्या परकीय गुंतवणुकीपेक्षा गुंतवणुकीसाठी भारताबाहेर जाणाऱ्या पैशाचे प्रमाण अधिक आहे. अर्थातच यामुळे भारतीय धोरणांवर उद्योगपतींचा प्रभावही वाढतो आहे. दुसरीकडे, अडाणींच्या मार्फत पाश्चात्य देश भारतातील उद्योगविश्व कह्यात घेण्याच्या प्रयत्नात आहेत. येथील नैसर्गिक साधनसंपत्तीवर कब्जा करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. ते येथे थेट काही करु शकत नसले तरी अडाणींच्या मार्फत हे काम सुरू आहे. असे असताना चीनबरोबरचा संघर्षही संपलेला नाही. चीनी साहित्यावर बहिष्कार टाकण्याची अधूनमधून होणारी घोषणा हा त्याचाच भाग म्हणावा लागेल. त्या दृष्टीने काही धोरणेही राबवली जातात. पण काहीही केले तरी भारताला चीनशी असणारे व्यापारी संबंध तोडणे शक्य नाही, हे २०२५ ने दाखवून दिले आहे. पुढेही हीच स्थिती कायम राहील. आता चीनकडून होणारी आयात जवळपास तीन ट्रिलियनच्या घरात पोहोचली आहे. मात्र तेवढी निर्यात नसल्याने तूट वाढते आहे. येत्या काळात ही काळजीची बाब राहणार आहे.अलिकडच्या काळात व्यापार हाच आंतरराष्ट्रीय संबंध ठरवण्यात, निर्माण करण्यात महत्त्वाचा भाग बनतो आहे. त्यामुळे आता नेहरुंच्या काळातील विचार वेगाने मागे पडणार यात शंका नाही. मूल्ये, विचारांची एकरुपता, साम्राज्यवाद विरोध हे सगळे विषय आता मागे पडले असून येता काळ व्यापारी संबंधांना महत्त्व येण्याचा असेल. उदाहरण द्यायचे तर आता इस्रायलशी आपले संरक्षण करार खूप वाढत आहेत. आपण त्यांना संरक्षण सामग्री देतो तर त्यांच्याकडून तंत्रज्ञान घेतो. हे नवीन धोरण आहे. पूर्वी असे नव्हते. इस्रायलचा मूळ संघर्ष मुस्लीम राष्ट्रांशी असल्याचे इथे विसरुन चालणार नाही. आजमितीला एक कोटीपेक्षा जास्त भारतीय मुस्लीम देशांमध्ये काम करतात. त्यांच्याकडून आपल्याला प्रचंड प्रमाणात परकीय चलन मिळते. म्हणूनच सरकारने धोरणे राबवताना याचा विचार करणाची नितांत गरत जाणवते. आज जगातील प्रत्येक देशाला भारताशी व्यापारी संबंध हवे आहेत, कारण मोठी बाजारपेठ असणारा हा देश व्यापारवृद्धीसाठी आवश्यक आहे.

# केंद्रस्तरीय मतदान पर्यवेक्षक अधिकारी गोपाल खाडे यांचा दिल्लीत सन्मान

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड :** पी.एम.श्री. जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव येथे कार्यरत शिक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय पर्यवेक्षक अधिकारी श्री गोपाल खाडे यांचा राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण संपन्न केल्याबद्दल नवी दिल्लीतील भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था येथे सन्मान करण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने १२ व १३ जून रोजी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी नवी दिल्लीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.यात जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी,तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणात उपस्थित होते. या प्रशिक्षणात वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.,




रिसोडच्या उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर,३५ कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधि गोपाल खाडे,वाशिम विधानसभा मतदारसंघाचे सुभाष जवंजाळ व रिसोड मतदारसंघाचे प्रतिनिधी शेख इरफान शेख मुसा हे सहभागी झाले होते .गोपाल खाडे यांनी बीएलओ ॲप अधिक सुलभ व प्रभावी करण्याबाबत केंद्रस्तरीय मतदान अधिकारी व केंद्रस्तरीय मतदान पर्यवेक्षक अधिकारी यांच्यात समन्वय राहण्याकरिता पर्यवेक्षकांना सुद्धा आपल्या केंद्रांतर्गत बीएलओ यांचे ॲप पाहता यावे अशी योजना असावी अशी विनंती आपल्या मनोगता तून व्यक्त केली केली. सध्या बीएलओ ॲप मध्ये पर्यवेक्षकांना हे



ॲप पाहता येत नसल्याने बी.एल. ओं ना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करताना पर्यवेक्षक अधिकाऱ्यांना अडचणी येतात. राष्ट्रीय स्तरावर या सूचनेची नोंद घेण्यात आली.

तसेच यावेळी बीएलओ आणि पर्यवेक्षक यांचे गट करून त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे फॉर्म भरण्यासंदर्भात भूमिका अभिनय सादर करावयाला सांगितला होता. यात गोपाल खाडे यांनी मतदाराची भूमिका सादर करून मनोरंजक पद्धतीने सर्व गटांनी फॉर्म कसे भरावे व त्यासाठी कोणकोणते कागदपत्रे लागतात येथे सादरीकरण केले. गोपाल खाडे यांनी आपल्या सादरीकरणात अमरावती अकोला वाशिम बुलढाणा आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या वऱ्हाडी भाषेचा उपयोग केला होता. त्यांच्या मनोरंजनातून अंजन घालणारे सादरीकरण महाराष्ट्रातील अधिकारी व बीएलओ यांना खूप आवडले.

महाराष्ट्राचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात मूर्तिजापूरचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार व मनोज लोणारकर मास्टर ट्रेनरनी उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक जोशी,निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग हे उपस्थित होते.

यावेळी गोपाल खाडे यांनी त्यांच्या नावाचे सुलेखन करून भेट दिले.या सुलेखनाबद्दल डॉ.विवेक जोशी यांनी गोपाल खाडे यांचे कौतुक व अभिनंदन केले.

गोपाल खाडे हे आपल्या यशाचे श्रेय जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस,उपविभागीय अधिकारी कैलास देवरे व तहसीलदार कुणाल झाल्टे, जिल्हा समन्वय अधिकारी सतीश काळे व शाळेचे मुख्याध्यापक प्रा. सुरेश राठोड यांना देतात.

# खेलो इंडिया खेलो स्पर्धेमध्ये किक बॉक्सिंग मध्ये महाराष्ट्राचा डंका

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव वार्ताहर/कळंबोली प्रतिनिधी :** "खेलो इंडिया खेलो" अस्मिता वुमन्स किती बॉक्सिंग लीग ही स्पर्धा चे दिनांक 25 ते 28 डिसेंबर या रोजी इंदोर, मध्य प्रदेश येथे झोनल लेवल किकबॉक्सिंग लीग स्पर्धेच आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, गुजरात, राज्यस्थान, तेलंगणा, गोवा, दिव दमन, दादर नगर हवेली, मध्य प्रदेश या राज्यांनी सहभाग घेतला होता, तसेच या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील ८४ महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला या स्पर्धेमध्ये आपल्या महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंनी इतिहास नोंदवत या स्पर्धेत एकूण ५१ पदक प्राप्त केले त्यात 20 सुवर्ण पदक, 17 रजत पदक, 14 कास्य पदकाची कमाई केली. तसेच कळंबोली येथील रायगड किकबॉक्सिंग असोसिएशन च्या वतीने आपल्या कळंबोली येथील इंडियन मार्शल आर्ट स्पोर्ट्स असोसिएशन च्या सानिका ठाकुर, उमंग तांडेल,श्रुतिका पारते सुवर्णपदक, मेनका मयुरा, सारंगी गोले ( रजत पदक ) जिया ठाकूर, दिपाली वाकचरे (कांस्य पदक), दिव्या पाटील, रिताशा सुर्वे, ऋतुजा माळी, मृदुला पाटील सहभाग पात्र ठरल्यामुळे रायगड नगरीमध्ये त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षा होत आहे, महाराष्ट्राचे अध्यक्ष निलेश शेलार सर, सचिव धीरज वाघमारे सर, सहसचिव विशाल सिंग सर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी खूप चांगली कामगिरी केली. त्यामुळे किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या रायगड च्या वतीने सर्वांचे मनापासून अभिनंदन व धन्यवाद. त्याचप्रमाणे



आपल्या महाराष्ट्राचे कोच ज्यांनी आपल्या जीवाचे रान करून आपल्या खेळाडूंना विजय मिळून देण्यासाठी ज्यांचा खारीचा वाटा आहे असे आपले कोच दीपा गावळे मॅडम, ओमकार राठोड, राम सोनूने,विघ्नेश मुरकर, शुभम सरोज, वरद सुपरकार, केदार म्हात्रे, श्रवण ठाकूर,दिया गायकवाड, मॅडम व सर्व सरांचे मनापासून अभिनंदन , शुभेच्छा व धन्यवाद

महाराष्ट्राने पुन्हा एकदा पहिल्या नंबर चा मान कायम राखल्यामुळे किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या रायगड यांच्यावतीने दीपेश सोलंकी, शैलेश ठाकुर, संतोष मोकळ, बंडू पाटील, अक्षय जाधव तसेच पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे, साप्ताहिक आवाज कोकणचा चे संपादक डॉक्टर वैभव पाटील, दै. महाराष्ट्र जीत चे पत्रकार अविनाश जाधव (कळंबोली पनवेल ) या सर्वांकडून खुप खुप अभिनंदन तसेच मेडलिस्ट मुलींचे चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्यामुळे सर्वांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# येडूर (बु.) ग्रामपंचायतीत विकासकामांत मोठा गैरव्यवहार

## नागरिकांकडून सखोल चौकशीची मागणी

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/ संघपाल मदने :** देगलूर तालुक्यातील येडूर (बु.) येथील ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता, निधीचा अपहार व कागदोपत्री कामे दाखवून प्रत्यक्षात काम न झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून याबाबत नागरिकांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.ग्रामपंचायतीच्या नोंदींमध्ये तब्बल १५ सीसी नाल्यांचे काम पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे, मात्र प्रत्यक्षात गावात केवळ ५ ते ६ नाल्यांचेच अस्तित्व दिसून येत आहे. शाळेसाठी दाखवण्यात आलेले स्वच्छालयाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून ते वापरण्यायोग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तसेच ग्रामपंचायतीत संगणक खरेदी झाल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले, परंतु प्रत्यक्षात कार्यालयात कोणताही संगणक उपलब्ध नाही. कचराकुंड्या, दिवाबत्ती व्यवस्था, सफाई व घनकचरा व्यवस्थापन याबाबतही अनेक वेळा खर्च दाखवण्यात आला असून प्रत्यक्षात ही कामे कधीच झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सफाईचे काम कागदोपत्री चार वेळा दाखवण्यात आले असताना प्रत्यक्षात एकदाही सफाई करण्यात आलेली नाही. घनकचरा व्यवस्थापनाचे काम तीन वेळा दाखवण्यात आले असून अंगणवाडीसाठी साहित्य खरेदी दाखवण्यात आली आहे, मात्र हे साहित्य प्रत्यक्षात उपलब्ध नाही.

विशेष बाब म्हणजे, 'ग्राम स्वराज्य' ॲपवर पावत्या अपलोड करून कामे झाल्याचे दर्शवण्यात आले आहेत, परंतु गावात त्या कामांचा कोणताही ठोस पुरावा आढळून येत नाही. यामुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर व फसवणूक झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व अपहार झालेला निधी ग्रामपंचायतीकडून परत वसूल करावा, अशी मागणी येडूर (बु.) येथील नागरिकांनी केली आहे.

याबाबत माधव सुभाष पाटील, सचिन गोविंदराव शेरीकर, गणेश पंढरीनाथ शिंदे, दत्तात्रय भरत बिरादार व बालाजी लक्ष्मण येरनवाड यांनी गटविकास अधिकारी, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे.

या तक्रारीची दखल घेऊन प्रशासनाकडून कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दिग्रस बु येथे रक्तदान शिबीर यशस्वी रित्या संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अकोला / नरेंद्र इंगळे :** ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था व सावन गवई मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने कालकथित सावन गजानन गवई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते व या रक्तदान शिबिराला युवा तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व दिग्रस बु येथील आजचे रक्तदान शिबीर यशस्वी रित्या संपन्न झाले या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांना अभिवादन करुन करण्यात आले त्यानंतर सावन गवई यांच्या फोटो ला हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दिग्रस बु



चे रोजगार सेवक विजय गवई, राहुल सोनोने, अमोल घायवट ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश देवराव हातोले, प्रशांत वानखडे, अविनाश पोहरे,किशोर सुरवाडे, सुरेंद्र अवचार, सागर हातोले, इत्यादी होते व मिलिंद गवई, रंजित गवई,सुबोध इंगळे,ओम उजाळे पाटील, आदित्य चिकटे,परिस गवई, भुषण इंगळे, हर्षल गवई, गोपाल सोनोने, अमित तेलगोटे, रोहित तेलगोटे, हरिश धबळगाव, सिद्धांत इंगळे, राज चिकटे, प्रेम ताले, अभिजीत गवई,कुणाल इंगळे, अभिषेक टेके, अक्षय आठवले, विकास गवई, निखिल गवई, किशोर गवई, इत्यादी लोकांचे सहकार्य लाभले सदर शिबिर हे जिल्हा शासकीय रुग्णालय अकोला येथील रक्तपेढी ला देण्यात आले.

# प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल निर्मळे यांनी भव्य शक्ती प्रदर्शन करत भरला उमेदवारी अर्ज

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर, (केतन भोज) :** घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्रातील मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १२३ मध्ये ज्या जागेवर शिंदेंची शिवसेना आणि भाजप यांच्या मध्ये तिकीट वाटपावरून मोठा पेच निर्माण झाला होता.त्या जागेसाठी अखेर सोमवारी रात्री(ता.२९) रोजी उशिरा भाजपचे इच्छुक उमेदवार अनिल निर्मळे यांना उमेदवारी जाहीर झाल्यावर वर याठिकाणी सर्वत्र तरुणांनी,भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडत उत्साह साजरा केला.अनिल निर्मळे यांचे प्रभाग क्रमांक १२३ मधील मागील बऱ्याच वर्षाचे सामाजिक काम बघता,आणि



त्यांची स्थानिक तरुणांमध्ये असलेली छाप पहाता त्यांना उमेदवारी मिळणे याठिकाणी निश्चितच होते असे स्थानिक तरुणांनी सांगितले.प्रभाग क्रमांक १२३ मधून भाजप-शिवसेना -आर.पी.आय.(ए) महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल निर्मळे यांनी मंगळवार(ता.३०)रोजी उमेदवारी भरण्याच्या शेवटच्या दिवशी भव्य शक्ती प्रदर्शन करत प्रचार रॅली काढली.या प्रचार रॅलीची सुरुवात घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राचे विद्यमान भाजपचे आमदार राम कदम तसेच भाजप ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री चंद्रकांत मालकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.ही भव्य प्रचार रॅली निळकंठेश्वर -डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक वर्षानगर - शंकर मंदिर,पार्कसाईट-आनंदगड-सुजाता हॉटेल -रामनगर मार्गे छत्रपती



शिवाजी महाराज चौक,अमृत नगर याठिकाणी आल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्यास अनिल निर्मळे यांच्याकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.ही प्रचार रॅली निवडणूक कार्यालय,पंतनगर इथपर्यंत काढण्यात आली. त्यानंतर अनिल निर्मळे यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज पंतनगर याठिकाणी असलेल्या निवडणूक कार्यालयात निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल केला.तसेच यावेळी काढण्यात आलेल्या या प्रचार रॅलीत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,महिलांचा सक्रीय सहभाग आणि तरुणांची ऊर्जा पाहायला मिळाली असून हे पाहता आता हा विजय अटळ असल्याचा विश्वास अधिक दृढ झाला असून,प्रभाग क्रमांक १२३ मधून जनतेचा स्पष्ट पाठिंबा मिळताना दिसत आहे. आपली साथ हीच आमची ताकद बनत विजयाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे यावेळी भाजप महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांनी सांगितले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## उमेदवारी अर्ज भरताना अलका गणेश भगत यांची भव्य प्रचार रॅली ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**घाटकोपर,(केतन भोज) :** घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्रातील मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १२७ मधून भाजप-शिवसेना -आर.पी.आय.(ए) महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांनी मंगळवार(ता.३०) रोजी उमेदवारी भरण्याच्या शेवटच्या दिवशी भव्य शक्ती प्रदर्शन करत प्रचार रॅली काढली. उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांनी सकाळी अमृत नगर येथील श्री स्वामी समर्थ महाराज मठातील स्वामी समर्थ महाराजांची पूजाअर्चा करून स्वामींच्या दर्शनाने पुढे नंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक,अमृत नगर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत या भव्य प्रचार रॅलीची सुरुवात घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राचे भाजपचे विद्यमान आमदार राम कदम,भाजप ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री - चंद्रकांत मालकर तसेच गणेश भगत यांच्या उपस्थितीत करण्यात आली.यानंतर ही भव्य प्रचार रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक - इंदिरा नगर- जगदूशा नगर - गोळीबार रोड मार्गे निवडणूक कार्यालय,पंतनगर इथपर्यंत काढण्यात आली.यावेळी या प्रचार रॅलीत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,महिलांचा सक्रीय सहभाग आणि तरुणांची ऊर्जा पाहायला मिळाली असून हे पाहता आता हा विजय




अटळ असल्याचा विश्वास अधिक दृढ झाला असून,प्रभाग क्रमांक १२७ मधून जनतेचा स्पष्ट पाठिंबा मिळताना दिसत आहे.आपली साथ हीच आमची ताकद बनत विजयाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे यावेळी भाजप महायुतीच्या उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांनी सांगितले.

# साई स्ट्राईकर्स SPL 8 चे विजेते डी. जे. बिल्डर्स उपविजेते

## सिंधी प्रीमियर लीगचा थरार उत्साहात संपन्न

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी/गोकुळ लोखंडे :** देवळाली कॅम्प येथील पूज सिंधी पंचायत आयोजित सिंधी प्रीमियर लीग (SPL) – सीझन 8 मध्ये साई स्ट्राईकर्स संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर डी. जे. बिल्डर्स संघ उपविजेता ठरला. अत्यंत अटीतटीच्या आणि जलद गतीच्या सामन्यात साई स्ट्राईकर्सने उत्कृष्ट फलंदाजी करत अंतिम सामना आपल्या नावावर केला.

डी. जे. बिल्डर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारत 10 षटकांत 88 धावा केल्या. मात्र कमकुवत गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाचा फटका त्यांना बसला. साई



स्ट्राईकर्सच्या सुरुवातीच्या काही फलंदाजांनी स्वस्तात माघार घेतली असली तरी 3 गडी बाद झाल्यानंतर संघाने संयम राखत विजयाचा टप्पा गाठला.

देवळाली कॅम्प, आनंद रोड येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानावर 26 डिसेंबर रोजी SPL सीझन 8 ची सुरुवात झाली. 26 ते 29 डिसेंबर दरम्यान एकूण 15 सामन्यांचा थरार क्रिकेटप्रेमींना पाहायला मिळाला. सर्व सामने पार पडल्यानंतर सोमवारी साई स्ट्राईकर्स आणि डी. जे. बिल्डर्स यांच्यात अंतिम सामना खेळविण्यात आला.या स्पर्धेत एकूण 7 संघांनी सहभाग घेतला होता.मुरली निहलानी यांची साई स्ट्राईकर्सअक्षय हंसवानी यांची डी. जे. बिल्डर्सअनिल आहुजा यांची आहुजा वॉरियर्सगोपाल कुकरेजा व संतोष कटारिया यांची नेक्स्ट लेव्हल प्रॉपर्टीजअनिल सचदेव यांची जी. के. बी. स्टुडिओनवीन केवलाणी यांची प्रकाश कलेक्शनदेवा सचदेव व टीकम केवलाणी यांची सचदेव हार्डवेअर पूज सिंधी पंचायतीचे अध्यक्ष रतन चावला यांच्यासह सदस्य हिरो रिजवानी, अमित रोहेरा, कन्हैयालाल आहुजा, सुनील चावला, नरेश कुकरेजा, मनोहरलाल माखीजा, मनोहर कृष्णानी, जयराम चावला, विजय कुकरेजा, टीकम केवलाणी, देवा सचदेव, तीर्थ गालानी, राजू नागदेव, नवीन केवलाणी आदींनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

स्पर्धेसाठी नेक्स्ट लेव्हल प्रॉपर्टीज हे मुख्य प्रायोजक होते, तर जी. के. बी. स्टुडिओ, शिवानंद इलेक्ट्रिकल, कल्पना गारमेंट्स, प्रकाश कलेक्शन, डॉ. गुजर सुभाष हाय स्कूल, पवन गिफ्ट सेंटर, शिवानंदा इलेक्ट्रॉनिक्स आदी सहप्रायोजकांचे मोलाचे सहकार्य लाभले.अंपायर प्रवीण अहिरे, निलेश औदुंबशिकर, सुजित चव्हाणके व सुजित पंड्यान यांनी घेतलेल्या योग्य निर्णयांमुळे सर्व सामने शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.या अंतिम सामन्यावेळी खासदार राजाभाऊ वाजे, सचिन ठाकरे, किशन अडवाणी, प्रेम मिरानी, सेवक दर्डा, प्रकाश लखवाणी, सुंदर रामचंदानी, रितिका कलानी यांच्यासह मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## उमेदवारी अर्ज भरताना अर्चना संजय भालेराव यांची भव्य प्रचार रॅली ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**घाटकोपर,(केतन भोज) :** घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्रातील मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १२६ मधून भाजप-शिवसेना -आर.पी.आय.(ए) महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अर्चना संजय भालेराव यांनी मंगळवार(ता.३०)रोजी उमेदवारी भरण्याच्या शेवटच्या दिवशी भव्य शक्ती प्रदर्शन करत प्रचार रॅली काढली. सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक,अमृत नगर येथील छत्रपती




शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत या भव्य प्रचार रॅलीची सुरुवात घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राचे भाजपचे विद्यमान आमदार राम कदम,भाजप ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री - चंद्रकांत मालकर,भाजपच्या महिला मोर्चा घाटकोपर पश्चिम विधानसभा अध्यक्षा- सौ.पूनम बोराटे(नायर) तसेच शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या उपस्थितीत करण्यात आली.यानंतर ही भव्य प्रचार रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक - आनंद नगर - गणेश मैदान - के.वि.के शाळा,उडपी हॉटेल,श्रेयस या मार्गे निवडणूक कार्यालय,पंतनगर इथपर्यंत काढण्यात आली.यावेळी या प्रचार रॅलीत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,महिलांचा सक्रीय सहभाग आणि तरुणांची ऊर्जा पाहायला मिळाली असून हे पाहता आता हा विजय अटळ असल्याचा विश्वास अधिक दृढ झाला असून,प्रभाग क्रमांक १२६ मधून जनतेचा स्पष्ट पाठिंबा मिळताना दिसत आहे.

आपली साथ हीच आमची ताकद बनत विजयाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे यावेळी भाजप महायुतीच्या उमेदवार सौ.अर्चना संजय भालेराव यांनी सांगितले.



**माहूर तालुक्यातील वाई बाजार फाटा ते गावापर्यंत रस्त्याचे बांधकाम सुरु आहे जाणाऱ्या- येणाऱ्याच्या डोळ्यात धुळीचे कण गेल्याने आरोग्य धोक्यात आले आहेत, त्यामुळे कंत्राटदारांनी रोज सकाळी, दुपारी व सायंकाळी रस्त्यावर पाणी मारण्याची प्रवाशा कडून मागणी केली आहे, रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.**

**छाया, सुभाष खडसे**

## भीमा कोरेगाव : इतिहास, स्वाभिमान आणि संघर्षाची अमर गाथा




भीमा नदीच्या शांत काठावर वसलेले कोरेगाव हे केवळ पुणे जिल्ह्यातील एक छोटेसे गाव नाही; ते भारतीय इतिहासातील सामाजिक संघर्ष, स्वाभिमान आणि परिवर्तनाचे प्रतीक बनले आहे. १ जानेवारी १८१८ रोजी येथे झालेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ दोन सैन्यांतील युद्ध नव्हती, तर शतकानुशतके दडपल्या गेलेल्या समाजाच्या आत्मसन्मानासाठी उभारलेला धगधगता प्रतिकार होता. त्या काळात भारतात तिसरे इंग्रज–मराठा युद्ध सुरू होते. पेशवा बाजीराव दुसऱ्यांच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्य पुण्याकडे कूच करत असताना, कोरेगाव येथे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या मर्यादित सैन्याशी त्यांची गाठ पडली. कंपनीच्या बाजूने अवघे ८३४ सैनिक होते, तर पेशव्यांच्या बाजूने हजारोंची फौज. संख्येचा हा असमतोल असूनही, कॅप्टन फ्रान्सिस स्टॉटन यांच्या नेतृत्वाखालील कंपनी सैन्याने तब्बल बारा तास जबरदस्त प्रतिकार केला आणि अखेरीस पेशव्यांच्या सैन्याला माघार घ्यावी लागली.

या लढाईचे खरे ऐतिहासिक महत्त्व मात्र सैनिकी विजय–पराजयापेक्षा वेगळ्या पातळीवर आहे. ब्रिटिश सैन्यातील ‘बॉम्बे नेटिव्ह लाइट इन्फेंट्री’च्या तुकडीत मोठ्या संख्येने महार समाजातील सैनिक होते. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे अमानुष नियम लादले गेले होते. महार समाजाला माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला गेला होता. अशा परिस्थितीत या समाजातील सैनिकांनी हातात शस्त्र घेतले, केवळ नोकरीसाठी नव्हे तर आत्मसन्मानासाठी. भीमा कोरेगावची लढाई म्हणजे सामाजिक गुलामगिरीविरुद्धचा आवाज होता. ही लढाई सांगते की इतिहास केवळ राजे, सरदार आणि सत्ताधीशांनी घडवलेला नसतो; तो सामान्य माणसाच्या संघर्षातूनही घडतो. महार सैनिकांनी येथे दाखवलेले शौर्य हे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे प्रतीक बनले.

लढाईनंतर ब्रिटिशांनी भीमा नदीच्या काठी उभारलेला ७५ फूट उंच विजयस्तंभ हा त्या शौर्याची साक्ष देतो. त्या स्तंभावर कोरलेली महार सैनिकांची नावे ही केवळ नावे नाहीत; ती हजारो वर्षांच्या अन्यायाला दिलेले उत्तर आहे. म्हणूनच हा विजयस्तंभ केवळ ब्रिटिश सैन्याच्या विजयाचे चिन्ह न राहता, दलित समाजाच्या आत्मसन्मानाचे स्मारक ठरला. याच ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे दरवर्षी १ जानेवारी रोजी कोरेगाव भीमा येथे लाखो लोक जमा होतात. बुद्धमूर्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन, शहीद सैनिकांना मानवंदना दिली जाते. ही गर्दी कोणत्याही राजकीय कार्यक्रमासाठी नसून, इतिहासाला साक्षी ठेवून स्वाभिमान जपण्याचा सामूहिक संकल्प आहे.

भीमा कोरेगाव हे स्थळ आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते, समाजातील कोणताही घटक कायमचा दडपला जाऊ शकत नाही. जेव्हा माणूस अन्यायाच्या विरोधात उभा राहतो, तेव्हा इतिहासाची दिशा बदलू शकते. आजही जातीय विषमता, सामाजिक भेदभाव आणि अन्यायाचे प्रकार विविध स्वरूपात दिसतात. अशा वेळी भीमा कोरेगावचा इतिहास आपल्याला सजग राहण्याची प्रेरणा देतो. मात्र या इतिहासाचा वापर द्वेष पसरवण्यासाठी नव्हे, तर समतेचा, बंधुत्वाचा आणि न्यायाचा विचार मजबूत करण्यासाठी व्हायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भीमा कोरेगावच्या इतिहासाकडे संघर्षातून परिवर्तनाचा मार्ग म्हणून पाहिले. आजही त्यांच्या विचारांच्या प्रकाशातच या घटनेकडे पाहण्याची गरज आहे.

भीमा कोरेगाव म्हणजे विजयाची मिरवणूक नाही; तो आत्मसन्मानाचा जागर आहे. तो आठवण करून देतो की लढाया केवळ रणांगणावरच नाही, तर समाजमनातही लढाव्या लागतात. आणि जेव्हा त्या लढाया न्याय, समता आणि मानवतेसाठी असतात, तेव्हा त्या इतिहासात अमर होतात. भीमा कोरेगाव हा केवळ भूतकाळ नाही; तो आजच्या आणि उद्याच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याचा दीपस्तंभ आहे. भीमा कोरेगावचा विजयस्तंभ हा केवळ इतिहास नाही, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आहे.

हा दिवस आपल्याला माणुसकी, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संकल्प अधिक दृढ करण्याची शक्ती देवो, हीच सदिच्छा. समता, स्वाभिमान आणि न्यायासाठी लढलेल्या शूर वीरांना विनम्र अभिवादन. भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रवीण बागडे

## कामरगावच्या विद्यार्थिनींनी गाजवला कवी कट्टा

### लेखिका संमेलनात ग्रंथदिंडीतही केले धमाल सादरीकरण

**कारंजा लाड :** पी.एम.श्री. जिल्हा परिषद विद्यालय कामरगावच्या निवड झालेल्या विद्यार्थिनींनी लेखिका संमेलनातील कवी कट्टा गाजवला. २५ डिसेंबरला अकोला येथे विदर्भ साहित्य संघाचे लेखिका संमेलन संपन्न झाले या संमेलनात कवी कट्टा काव्य लेखन कार्यशाळा ब्लॉग लेखन कार्यशाळा कवी संमेलन अशा विविध सांस्कृतिक गोष्टींचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक प्रा सुरेश राठोड गोपाल खाडे,,नीता तोडकर,सतीश चव्हाण व कैलास वानखडे यांच्या मार्गदर्शनात कवी कट्ट्यासाठी निवड झालेल्या कु.आरुषी संदीप भुजाडे( माझा कस्तकार बाप ),कु. जानवी जीवन देशमुख (स्वप्न),कु.श्रावणी जगदीश ठाकरे( असे लिहिले मी घाई घाई ),तनुजा पंकज पांडे ( माझा बाप),आचल उमेश लाड( माझा पेन ), कु.सिद्धी दिलीप जुननकार ( माझी आई),धनश्री केशव चौके( विज्ञान युग हे खर ),परी शरद घोडे ( गाजर मुळा भाऊ भाऊ ) व तबस्सुम शेख हफीज हिने आयुष्य या कविता सादर केल्या.




कामरगावातील विद्यार्थिनींनी एकापेक्षा एक सरस अशा कविता सादर करून रसिक श्रोत्यांची मने जिंकली. लेखिका संमेलनाच्या आयोजकांनी व सूत्रसंचालक यांनी विद्यार्थिनी व शिक्षकांचे कौतुक आवर्जून कौतुक केले.

शिक्षण उपसंचालक शिक्षण परिषद पुणे सुचिता पाटेकर यांनी विद्यार्थिनी व शिक्षकांचे कौतुक केले. पायल सुनील माहूरकर,कृष्णाई विनोद गाढवे ह्या सर्व कवयित्रींसह कविता कार्यशाळेत सहभागी झाल्या होत्या. यावेळी आयोजित झालेल्या निबंध स्पर्धेत तनुजा पंकज पांडे या विद्यार्थीला ५०० रुपयांचे बक्षीस देऊन डॉ.भारती सुदामे,डॉ.श्रीकांत तिडके,प्रदीप दाते, विजय कौसल,डॉ. गजानन नारे या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

ग्रंथदिंडीतही कामरगावच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी दमदारपणे सादरीकरण केले.’मोबाईल सोडा व पुस्तकाशी मैत्री करा’ असा संदेश ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून दिला.गोपाल खाडे या शिक्षकांनी कच्छी घोडीचे बहारदार नृत्य सादर केले. या नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली.

यावेळी गोपाल खाडे यांनी संग्रहित केलेल्या ‘प्रेमपत्राच्या दुनियेत’ या प्रेम पत्र संग्रहाचे प्रदर्शनी या ठिकाणी लावण्यात आले होते.रसिक प्रेक्षकांनी या प्रेमपत्राच्या प्रदर्शनी चे खूप कौतुक केले. अभिनेत्री व लेखिका संमेलनाच्या उद्घाटक डॉ.श्वेता पेंडसे यांनी अभिनव प्रेमपत्र प्रदर्शनीचे खूप कौतुक केले. ग्रामीण विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे सर्व स्तरातून संमेलनातील यशाबद्दल कौतुक होत आहे.

## वाई बाजार येथील ज्येष्ठ नागरिक आझाद खान पठाण यांचे निधन

**सुभाष खडसे/तालुका प्रतिनिधी :** माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील ज्येष्ठ नागरिक आझाद खान कासम खान पठाण यांचे आज दि.३० डिसेंबर मंगळवार रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले आहे.आझाद खान यांच्या जाण्याने संपूर्ण वाई बाजार वासियांनी एक ज्येष्ठ मार्गदर्शक गमावल्याची भावना व्यक्त केली असून आज दुपारी २ वाजता त्यांच्या पार्थिव देहावर वाई बाजार येथील कब्रस्थान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आझाद खान पठाण हे तरुण पिढीला सामाजिक शैक्षणिक या विषयावर नेहमी



मार्गदर्शन करीत होते, ते सामाजिक कार्यकर्ते अमजद खान पठाण, अमन खान पठाण अहेमद खान पठाण अन्सार खान पठाण यांचे वडील होत,यांच्या पश्चात पत्नी ४ मुले सुना नातवंडे असा आप्त परिवार असून त्यांच्या आकस्मित मृत्यू मुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे,

# ध्यानातून व्यक्ती आणि समाजात जागतिक शांततेचा प्रवास

**मानवजातीच्या इतिहासात शांततेचा शोध हा नेहमीच गहन, अविचलित आणि अत्यंत आवश्यक राहिला आहे. युद्ध, हिंसा, अन्याय, सामाजिक असमानता, धार्मिक व वांशिक द्वेष अशा अनेक संकटांनी भरलेल्या जगात "शांतता" हा शब्द केवळ आदर्श ठरला आहे; प्रत्यक्ष अनुभव मात्र अनेकदा दुर्मिळ ठरतो. आजचे जग वेगवान, तणावपूर्ण, स्पर्धात्मक आणि माहितीप्रधान आहे, जिथे व्यक्ती बाह्यदृष्ट्या प्रगत होत असली तरी अंतर्मनात असुरक्षित, कलहग्रस्त आणि मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. अशा परिस्थितीत, ३१ डिसेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक शांतता ध्यान दिवस' हा केवळ सांकेतिक दिवस नाही, तर तो व्यक्तीला आत्मपरीक्षण, अंतर्मुखता, मानसिक स्थैर्य आणि सामाजिक-सौहार्द साधण्याची अनन्यसाधारण संधी देणारा दिवस ठरतो.**

महाराष्ट्र जीत

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शांतता ही केवळ युद्धाचा अभाव नसून, ती सामाजिक समरसता, विश्वास, सहकार्य, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांच्या जिवंत अनुभवाशी निगडित आहे. व्यक्तीच्या मनात द्वेष, भीती, असुरक्षितता आणि तणाव असल्यास सामाजिक संस्था, कुटुंबव्यवस्था आणि राजकीय रचना कितीही सक्षम असल्या तरी त्या अस्थिर राहतात. त्यामुळे शाश्वत शांततेचा पाया व्यक्तीच्या अंतर्मनात घातला पाहिजे. या संदर्भात ध्यानाचा सामाजिक दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा ठरतो, कारण ध्यान केवळ मानसिक स्थैर्य निर्माण करण्याचे साधन नाही, तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर, समाजातील संवादावर आणि सामाजिक संरचनेवरही दिसतो.

ध्यान हे केवळ आध्यात्मिक साधन नसून मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्वास्थ्य साधण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. भारतीय परंपरेत ध्यान, योग आणि चिंतन यांना आत्मशुद्धी आणि समाजसुधारणेची साधने मानले गेले आहेत. महात्मा बुद्ध, महावीर, पतंजली तसेच संत परंपरेतील विचारवंतांनी ध्यानाच्या माध्यमातून अहिंसा, करुणा, समत्व, संयम आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक समाजशास्त्रातही ध्यानाकडे 'मानसिक आरोग्य सुधारणा', 'तणाव व्यवस्थापन' आणि 'सामाजिक समरसता वृद्धिंगत करणे' ह्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. ध्यानामुळे व्यक्ती स्वतःच्या भावनांशी जुळते, वर्तन नियंत्रित होते, निर्णयक्षमतेत सुधारणा होते आणि सहिष्णुता, करुणा व सामाजिक जाणीव वाढते.

आजच्या समाजात तणावाचे स्वरूप बहुआयामी झाले आहे. बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, कौटुंबिक कलह, शैक्षणिक स्पर्धा, शहरीकरण, सामाजिक माध्यमांचा अतिरेक, राजकीय ध्रुवीकरण आणि पर्यावरणीय संकटे यामुळे व्यक्तीच्या मनावर सातत्याने ताण निर्माण होतो. या तणावाचे रूपांतर अनेकदा हिंसा, गुन्हेगारी, कौटुंबिक कलह, व्यसनाधीनता आणि सामाजिक असहिष्णुतेत होते. अशा परिस्थितीत ध्यान व्यक्तीला स्वतःशी जोडते, मन शांत करते आणि प्रतिक्रियात्मक वर्तनाऐवजी विवेकपूर्ण प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्ती आणि समाज यांच्यात गहन परस्पर संबंध आहे. व्यक्ती अस्वस्थ असेल तर समाज अस्वस्थ होतो; समाज अस्वस्थ असेल तर व्यक्ती अधिक अस्वस्थ बनतो. ध्यानाची प्रक्रिया या दुष्चक्राला तोड देते. जेव्हा व्यक्ती नियमित ध्यान करते, तेव्हा संयम, आत्मनियंत्रण, सहानुभूती आणि सामाजिक समरसतेची जाणीव जागृत होते. कौटुंबिक नातेसंबंध सुधारतात, कार्यस्थळी संघर्ष कमी होतात, शाळा-महाविद्यालयांत सहकार्य वाढते आणि समाजात विश्वास व सहिष्णुतेची भावना बळकट होते. अशा प्रकारे ध्यान ही



वैयक्तिक साधना असली तरी तिचा परिणाम सामूहिक आणि सामाजिक स्वरूपाचा ठरतो.

'जागतिक शांतता ध्यान दिवस' वर्षाच्या अखेरीस येतो, ही बाबही प्रतीकात्मक आहे. संपूर्ण वर्षभराच्या धावपळीचा, संघर्षाचा, यश-अयशाचा, वेदना-आशेचा लेखाजोखा घेण्याची ही संधी असते. समाज म्हणून आपण कुठे चुकलो, कुठे द्वेष वाढवला, कुठे संवाद तुटला, कुठे मानवी मूल्ये दुर्लक्षित केली, याचे चिंतन करण्याची वेळ आहे. ध्यानाच्या माध्यमातून ही आत्मपरीक्षणाची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण, सखोल आणि स्थिर होते.

जागतिक पातळीवरही परिस्थिती संवेदनशील आहे. युद्धे, दहशतवाद, धार्मिक व वांशिक संघर्ष, विस्थापन, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय संकटे यांमुळे जग अस्थिर झाले आहे. आंतरराष्ट्रीय करार, कायदे आणि संस्था यांची भूमिका महत्त्वाची आहे; परंतु फक्त बाह्य उपाययोजना शाश्वत शांतता निर्माण करू शकत नाहीत. शाश्वत शांततेसाठी मानसिक स्थैर्य, नैतिक जाणीव, सहिष्णुता आणि करुणा आवश्यक आहेत. ध्यानाद्वारे व्यक्तीमध्ये ही मानसिक स्थैर्य आणि सहानुभूती निर्माण होते, जी सामाजिक बदलाला चालना देते.

आज अनेक देशांमध्ये शाळा, रुग्णालये, कारागृह, लष्कर आणि कार्यालयांमध्ये ध्यानाचा उपयोग केला जातो. उद्दिष्ट फक्त कार्यक्षमता वाढविणे नसून मानसिक आरोग्य सुधारणा, सामाजिक समरसता व सहानुभूती वृद्धिंगत करणे हेदेखील आहे. समाजशास्त्रीय अभ्यास दर्शवितात की ध्यान करणाऱ्या व्यक्तींमध्ये आक्रमकता कमी, सहानुभूती अधिक, निर्णयक्षमतेत सुधारणा आणि सामाजिक नियमांचे पालन करण्याची प्रवृत्ती वाढते. त्यामुळे ध्यानाचे सामाजिक परिणाम व्यक्तिविशेषापेक्षा व्यापक असतात, आणि ते समाज सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.भारतीय समाजाच्या संदर्भात ध्यानाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विविधता, बहुसांस्कृतिकता, धर्म, भाषा, जातीय भिन्नता यांमुळे शांत सहअस्तित्व राखणे आव्हानात्मक आहे. अशा समाजात कायदे आवश्यक आहेत, परंतु अंतर्मनातून सहिष्णुता, समभाव आणि करुणा निर्माण करणाऱ्या साधनांची गरज आहे. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीच्या मनातून द्वेष, द्वंद्व आणि प्रतिस्पर्धात्मक भावना दूर करून 'मी आणि तो' या संकल्पनेला 'आपण' या व्यापक भावनेत रूपांतरित करते.

'जागतिक शांतता ध्यान दिवस' हा दिवस फक्त ध्यान करणाऱ्यांचा दिवस नाही; तो समाजातील प्रत्येक घटकासाठी आत्मचिंतन, सुधारणा आणि सामाजिक जाणीव वाढविण्याचा दिवस आहे. शिक्षकांसाठी हा विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण देण्याचा दिवस आहे; पालकांसाठी मुलांशी संवाद सुधारण्याचा दिवस; राजकारण्यांसाठी सत्तेपेक्षा सेवा व संवादावर भर देण्याचा दिवस; सामान्य नागरिकांसाठी द्वेष, हिंसा आणि अफवा यांना नकार देऊन शांत संवाद स्वीकारण्याचा दिवस आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ध्यान ही एक 'सॉफ्ट सोशल टेक्नॉलॉजी' आहे. ती कोणावर लादता येत नाही; परंतु स्वीकारली गेली तर समाजात सकारात्मक बदल घडवू शकते. ध्यानामुळे निर्माण होणारी शांतता निष्क्रिय नसून सजग, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडवते. अशा नागरिकांकडूनच न्याय्य, समतावादी आणि शांततामय समाजाची उभारणी शक्य होते.

आजच्या डिजिटल युगात, जिथे प्रतिक्रिया वेगवान आणि संवेदनांचा अभाव असतो, तिथे थांबून श्वासाकडे लक्ष देणे, मन शांत करणे आणि दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे ही क्रांतिकारी कृती ठरते. 'जागतिक शांतता ध्यान दिवस' आपल्याला ही शांत क्रांती साध्य करण्याची आठवण करून देतो, ज्यामुळे व्यक्तीपासून समाजापर्यंत सकारात्मक ऊर्जा पोहोचते आणि दीर्घकालीन सामाजिक सौहार्द व सामूहिक कल्याण घडते.

शेवटी असे म्हणता येईल की शाश्वत जागतिक शांतता फक्त राष्ट्राध्यक्षांच्या बैठका, आंतरराष्ट्रीय करार किंवा कायद्यांमधून निर्माण होत नाही; ती प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनातून जन्माला येते. ध्यान ही प्रक्रिया अंतर्मनात शांततेचे बीज रोवते, संयम निर्माण करते आणि करुणाभाव जागृत करते. जर आपण डिसेंबर३१र हा दिवस द्वेष, तणाव आणि अस्वस्थतेचा शेवट करून शांतता, सहिष्णुता, करुणा आणि मानवी मूल्यांचा नव्या वर्षाचा आरंभ म्हणून साजरा केला, तरच जागतिक शांतता ध्यान दिवसाचा खरी अर्थपूर्ण साजरा होईल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# तुमच्या शरीराला किती वेळ झोप आवश्यक आहे?

महाराष्ट्र जीत

दिवसभर कामासाठी पोटापाण्यासाठी धावपळ केल्यानंतर शरीर, मेंदू आणि मनाला विश्रांतीची गरज असते. दुसऱ्या दिवशी पुन्हा एनर्जीने काम करण्यासाठी तुम्हाला झोप आवश्यक आहेच. पण या धावपळीत तुम्हाला जर कमी झोप मिळत असेल तर तुम्ही नकळत तुमच्या आरोग्याचं नुकसान करून घेत आहात. झोप ही ईच्छेवर अवलंबून नसून ती आरोग्यासाठी खूप आवश्यक आहे. असं संशोधनांमधून असं स्पष्ट झालंय.

तज्ज्ञांच्या मते, फक्त लहान मुलांनाच नाही तर प्रौढांना सुद्धा पुरेशी झोप गरजेची असते. तुमच्या जन्मापासून म्हातारपणापर्यंत यात खूप बदल होतात.

नुकत्याच जन्मलेल्या बाळांना दररोज १४ ते १७ तासांची झोप हवी असते आणि ही झोप थोड्या थोड्या वेळाची असते. याला तुटक स्वरुपाची सुद्धा म्हणू शकतो.

चार ते अकरा महिन्यांच्या बाळांना रात्री थोडी सलग झोप मिळायला सुरुवात होते. हे वय तुटक स्वरुपाची झोप कमी करतं. तरीही दिवसा झोपणं आवश्यक असतं. एक ते दोन वर्षांच्या लहान मुलांसाठी ११ ते १४ तासांची झोप आवश्यक असते. तीन ते पाच वर्षांच्या मुलांमध्ये डुलकी कमी होत जाते, त्यामुळे ठराविक वेळेची झोपेची सवय फायदेशीर ठरते.

सहा ते बारा वयोगटातील मुलांसाठी ९ ते १२ तासांची झोप स्मरणशक्ती आणि शारीरिक वाढीसाठी आवश्यक असते. तेरा ते अठरा वयोगटातील किशोरवयीन मुलांना शरीरघड्याळ उशिरा झोपण्याची सवय लावतं. तरी त्यांना ८ ते १० तासांची झोप गरजेची असते. अठरा ते ६४ वयोगटातील प्रौढांसाठी ७ ते ९ तासांची झोप गरजेची असते. पंच्याहत्तर वर्षांनंतर झोप हलकी होत असली तरी सात ते आठ तासांची झोप मेंदूच्या आरोग्यासाठी आणि प्रतिकारशक्तीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचं तज्ज्ञ सांगतात.चांगली झोप मिळण्यासाठी दररोज, सुट्टीच्या दिवशीसुद्धा, झोपण्याची आणि उठण्याची वेळ ठरवणं गरजेचं आहे. झोपण्याआधी मोबाईल, टीव्ही यांसारख्या स्क्रीनपासून दूर राहणं, खोलीत लाइट बंद करून राहणं, शांत वातावरण आणि थोडं थंड तापमान ठेवणं फायदेशीर ठरतं.

# गरुड पुराणानुसार मृत्यू जवळ आल्यावर कोणते संकेत दिसतात?

महाराष्ट्र जीत

गरुड पुराण हे हिंदू धर्मामध्ये खूप महत्त्वाचे मानले जाते. यात १९००० श्लोक असून दोन भागात त्याची विभागणी करण्यात आली आहे. धार्मिक श्रद्धेनुसार गरुड पुराणाचे पठण केल्याने मृत व्यक्तीला मोक्ष मिळण्यास मदत होते आणि मृताच्या कुटूंबातील सदस्यांना आध्यात्मिक शांती मिळते असे म्हणतात. या पुराणात व्यक्तीचा



शेवटचा प्रवास म्हणजेच मृत्यू आणि आत्म्याचा प्रवास यांचे तपशीलवार वर्णन करण्यात आले आहे.

आज आपण गरुड पुराणातील असे संकेत जाणून घेऊयात जे मृत्युपूर्वी म्हणजेच मृत्यू जवळ आल्याचे असतात.

सावली न दिसणे – गरुड पुराणानुसार, एखाद्या व्यक्तीला त्याची सावली दिसत नसेल तर हे मृत्यू जवळ आल्याचे लक्षण आहे.

आवाज न येणे – गरुड पुराणानुसार जर दोन्ही कान बोटांच्या टोकांनी बंद केले आणि आवाज येत असेल तर असे मानले जाते की व्यक्तीचा मृत्यू जवळ आला आहे.

पूर्वज दिसणे – जेव्हा मृत्यू जवळ येतो तेव्हा पूर्वज दिसू लागतात, आपल्याला हाक मारताना दृष्य दिसते.

त्यामुळे असा संकेत दिसत असेल तर मृत्यू जवळ आला आहे असे समजावे.हाताच्या रेषा हलक्या होणे – तळहाताच्या रेषा फिकट होत असतील तर हे मृत्यू जवळ आल्याचे लक्षण आहे. जर असे घडत असेल तर त्या व्यक्तीचा मृत्यू जवळ आला आहे असे समजावे.


# नवे वर्ष कसे असावे!

## आशा, आत्मपरीक्षण आणि जबाबदारीचा संकल्प

महाराष्ट्र जीत

नवे वर्ष दारात उभे असते तेव्हा केवळ कॅलेंडर बदलत नाही; माणसाच्या मनातही एक नवा आरंभ जन्म घेतो. मागील वर्षाच्या आठवणी, जखमा, अपयश, आनंद, संघर्ष आणि यश यांचा गठ्ठा पाठीवर घेऊन आपण पुढे चाललो असतो. म्हणूनच नवे वर्ष हे फक्त शुभेच्छांचे औपचारिक निमित्त न राहता, आत्मपरीक्षणाचे, बदलाचे आणि जबाबदारी स्वीकारण्याचे पर्व असायला हवे. आजचा समाज वेगवान आहे, पण विचाराने मागे पडत चालला आहे. तंत्रज्ञान प्रगत झाले, साधने वाढली; मात्र संवेदना कमी होत आहेत. नवे वर्ष कसे असावे, हा प्रश्न विचारताना आपण आधी हे ठरवायला हवे की आपल्याला कोणते माणूसपण जपायचे आहे. स्पर्धेच्या गर्दीत माणूस हरवणार नाही, अशी दिशा नवे वर्ष देऊ शकेल का, याचे उत्तर आपल्या वर्तनात दडले आहे.

नवे वर्ष सत्य आणि प्रामाणिकपणाचे असावे. खोट्या आश्वासनांचा, पोकळ घोषणांचा आणि दिखाव्याच्या विकासाचा कंटाळा समाजाला आला आहे. राजकारण असो वा प्रशासन, नातेसंबंध असोत वा सार्वजनिक जीवन, प्रामाणिकपणा हीच खरी सुधारणा ठरू शकते. बोलण्यात





नव्हे, तर कृतीत दिसणारे सत्य हेच नवे वर्ष मागते. नवे वर्ष समतेचे आणि न्यायाचे असावे. वाढती विषमता, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि वंचितांचे वास्तव, या साऱ्यांकडे डोळेझाक करून विकास शक्य नाही. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचेल, ही केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कृती नवे वर्ष घडवू शकते.

नवे वर्ष संवेदनशीलतेचे असावे. आज आपण पटकन दुखावतो, पटकन चिडतो आणि तितक्याच पटकन विसरतो. पण माणूस म्हणून आपण ऐकणे, समजून घेणे आणि मदत करणे विसरत चाललो आहोत. एखाद्याच्या वेदनेला शब्दांची नव्हे, तर उपस्थितीची गरज असते. ही संवेदना समाजात रुजवणे हे नवे वर्षाचे मोठे आव्हान आहे. नवे वर्ष विचारशील तरुणाईचे असावे. तरुण हातात भविष्य आहे, पण त्या हातांना योग्य दिशा हवी. केवळ नोकरी, पैसा किंवा प्रसिद्धी हेच ध्येय न राहता समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा निर्माण झाली, तरच नवे वर्ष अर्थपूर्ण ठरेल. प्रश्न विचारणारी, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी तरुणाई हेच देशाचे खरे भांडवल आहे.

नवे वर्ष पर्यावरण-जागरूकतेचे असावे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास झाला, तर येणारी वर्षे आपल्याला माफ करणार नाहीत. पाणी, हवा, जंगल आणि जमीन हे केवळ संसाधन नाहीत, तर आपल्या अस्तित्वाचा श्वास आहेत. नवे वर्ष निसर्गाशी समन्वय साधणारे असावे, संघर्ष करणारे नव्हे

नवे वर्ष जबाबदारी स्वीकारणारे असावे. चूक झाली तर दोष दुसऱ्यावर ढकलण्याऐवजी स्वतःकडे पाहण्याची तयारी असली पाहिजे. नागरिक म्हणून, पालक म्हणून, अधिकारी म्हणून, पत्रकार म्हणून, शिक्षक म्हणून आपापल्या भूमिकेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, तर बदल अटळ आहे. खरेतर नवे वर्ष कसे असावे, यापेक्षा आपण कसे असावे हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण वर्ष बदलते, पण समाज बदलतो तो माणसामुळे. म्हणून या नव्या वर्षात मोठमोठ्या संकल्पांपेक्षा छोटे, पण प्रामाणिक बदल करूया. एकमेकांशी माणूस म्हणून वागूया, अन्यायाविरुद्ध आवाज उठवूया आणि आशा जिवंत ठेवूया. नवे वर्ष हे केवळ शुभेच्छांचे नव्हे, तर संकल्पांचे वर्ष ठरू दे. कारण जेव्हा माणूस बदलतो, तेव्हाच वर्षालाही नवेपण येते. नवे वर्ष आपल्यासाठी आरोग्य, समाधान, लेखणीला नवे बळ, विचारांना नवी दिशा आणि समाजाला स्पर्श करणारे सृजन घेऊन येवो, हीच सदिच्छा.सदैव शब्दांतून सत्य, संवेदना आणि सामाजिक भान व्यक्त होत राहो. सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



**प्रवीण बागड़े**